संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# गृहिणींचा सन्मान! ऐतिहासिक निर्णय

भारतासारख्या कुटुंबव्यवस्थेला वेगळं महत्त्व असलेल्या देशामध्ये घरातील गृहिणी ही किती महत्त्वपूर्ण आहे हे सर्वोच्च न्यायालयाच्या एका ताज्या निकालावरून आता अधिक ठळकपणाने स्पष्ट झाले. जगाच्या पाठीवर भारत हा असा एकमेव देश आहे की जिथे समाजव्यवस्था एका सशक्त कुटुंबपद्धतीवर आधारलेली आहे. आणि या कुटुंब पद्धतीचा प्रमुख कणा त्या घरातली गृहिणी असते. भारताला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे होत आहेत. आणि गेल्या काही शतकांची इथली समाजव्यवस्था पाहिली तर ती पुरुष प्रधान असल्याचे पाहायला मिळते. शंभर वर्षांपूर्वी भारतातल्या स्त्रियांना घरप्रपंचात अडकवून ठेवले जात होते. आता काळ बदलला आणि भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास तीस ते चाळीस टक्के महिला या घराबाहेर पडून नोकरी व्यवसाय करू लागल्या. परंतु अजूनही किमान पन्नास ते साठ टक्के घरामध्ये त्या घरातली गृहिणी आपला प्रपंच चालवण्यासाठीच अधिक परिश्रम करीत असते. ती बाहेर नोकरी व्यवसाय करू शकते. परंतु कुटुंबाची अनेक अर्थांनी काळजी घेण्याचे काम या घरातील गृहिणी करते. मुलाबाळांच्या संगोपनाबरोबर घराची व्यवस्था टिकवून ठेवण्यात तिचा मोलाचा सहभाग असतो. आजही या घरकामामध्ये हातभार लावणाऱ्या गृहिणींची संख्या प्रचंड आहे. त्या नोकरी व्यवसाय करीत नाहीत. म्हणून त्यांचे महत्त्व कमी लेखता येणार नाही. त्यांच्याकडून होणारे घरकाम किंवा कुटुंबाची व्यवस्था यासाठी त्यांच्याकडून घेतल्या जाणाऱ्या परिश्रमाचा मोबदला ठरवायचा झाला तर तो महिना तीस हजार होऊ शकतो. आणि कुठल्याही अचानकपणे उद्भवलेल्या संकटामध्ये एखाद्या घरातील गृहिणीचा मृत्यू झाला तर त्या कुटुंबाला तिचे तीस हजार मासिक उत्पन्न लक्षात घेऊन नुकसान भरपाई किंवा शासकीय मदत मिळाली पाहिजे अशा प्रकारचा अतिशय महत्त्वपूर्ण आणि आगळावेगळा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयाने देशभरातील कोट्यवधी महिलांचा खऱ्या अर्थाने सन्मान झाला आहे असे म्हणायला हरकत नाही.

### तीस हजारांचे मासिक वेतन

आतापर्यंतच्या पुरुष प्रधान परंपरेतल्या कुटुंबामध्ये घरकाम करणाऱ्या महिलेचे स्थान नेहमीच दुय्यम राहिलेले आहे. नोकरी करणारी महिला असली तरी तिच्याविषयी दाखवला जाणारा आदर किंवा तिचे समाजातले स्थानही वेगळेपणाने स्वीकारले जाते किंवा अधोरेखित होते. खरे तर श्रमाचा, कौशल्याचा व्यवस्थापनाचा एकूणच कुटुंबाच्या आर्थिक नियोजनाचा भार हा त्या घरातल्या महिलेवर असतो. व्यापक अर्थाने कुटुंबाच्या व्यवस्थापनाची मोठी गुणवत्ताही तिच्याकडे असते. परंतु ती केवळ नोकरी करीत नसल्याने तिच्या या गुणवत्तेचा आदर होत नाही किंवा विचारही होत नाही. उलट ती नोकरी करीत नाही म्हटल्यानंतर तिला गृहित धरले जाते. आणि मग घरातल्या गृहिणीने घरातली सगळी कामे केली पाहिजेत, असा अलिखित नियमच तिच्यावर लादला जातो. खरे तर वस्तुस्थिती तशी नसते. नोकरी करणाऱ्या स्त्रियांइतकीच कार्यक्षमता तिच्याकडे असते. आणि तिच्या या परिश्रमाचा योग्य तो सन्मान झाला पाहिजे. तिला गृहित धरता कामा नये असा एक व्यापक दृष्टिकोन सर्वोच्च न्यायालयाने देशापुढे ठेवला आहे. पंजाबमधल्या एका दुर्घटनेमध्ये एका महिलेचा मृत्यू होतो आणि तिच्या नुकसानभरपाईची मागणी करताना ती कशी देता येणार नाही याच्यावर वादप्रतिवाद होतो. सर्वोच्च न्यायालयाने हा प्रकार इतक्या गांभीर्याने आणि संवेदनशीलतेने हाताळला. आणि नुकसान भरपाई देताना तिच्या मासिक उत्पन्नाचाच विचार करायचा असेल तर तीस हजारांपेक्षा कमी होत नाही हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. स्वाभाविकपणे यापुढे जर असा कोणताही दुर्दैवी प्रसंग घरातल्या गृहिणींबाबत घडला तर तिला तीस हजार मासिक वेतन गृहित धरून नुकसान भरपाई मिळू शकेल. आता इतक्या महत्त्वाच्या निकालाबाबत केंद्र आणि राज्य सरकारने स्वतः पुढाकार घेतला पाहिजे. आणि घरकाम करणाऱ्या म्हणजेच नोकरी न करणाऱ्या महिलांच्या परिश्रमाला योग्य ते आर्थिक पाठबळ दिले पाहिजे. न्यायालयाचा हा निर्णय केंद्र आणि राज्य सरकारांसाठी एक दिशानिर्देश मानता येऊ शकतो.

### महिलांबाबतचा दृष्टिकोन

आज केंद्र आणि राज्य सरकारतर्फे महिला सशक्तीकरणाच्या वेगवेगळ्या घोषणा होत असतात. अगदी लाडकी बहीण योजनेपासून ते लखपती दिदीपर्यंत महिलांना रोजगाराच्या संधी देण्यासाठी प्रयत्न होतो. परंतु जवळपास दीडशे कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात समाज कितीही पुढारला, आधुनिक झाला तरी पुढची पाच पन्नास वर्षे गृहिणी म्हणून स्वयंस्फूर्तीने कुटुंबाची जबाबदारी सांभाळणाऱ्या महिलांची संख्या मोठीच राहणार आहे. कारण ती एकूणच कुटुंब व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण आधार ठरते. आज तर अगदी शिकल्या सवरलेल्या उच्चशिक्षित महिला काही काळ नोकरी करून स्वेच्छानिवृत्ती घेतात. आणि आपल्या कुटुंबाकडे लक्ष देण्याची भूमिका स्वीकारतात. एकूणच कुटुंब व्यवस्था आणि समाज व्यवस्थेसाठी कुटुंबातल्या गृहिणीचे स्थान हे अनन्यसाधारण राहणार आहे तिला जर अशा प्रकारचे आर्थिक संरक्षण वेगवेगळ्या योजनांच्यामार्फत मिळाले तर ते तिच्यासाठी अधिक सहाय्यभूत ठरणार आहे. दुर्दैवाने महिला सक्षमीकरणाच्या घोषणा जरी होत असल्या तरी अजूनही महिलांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात कोणताही अमूलाग्र बदल झाल्याचे दिसत नाही. त्याचे ठळक उदाहरण सर्वोच्च न्यायालयापुढे आलेली हीच पंजाबची केस आहे. नुकसान भरपाई मागणारा हा खटला तेवीस वर्षांपूर्वी न्यायालयात दाखल झाला होता. त्याबाबतचा निर्णय आता इतक्या उशीराने झालेला आहे. यावरून महिलांसदर्भातला दृष्टिकोन फार बदलला नसल्याचेच निदर्शक ठरते. आपल्या देशातील न्यायालयीन प्रक्रिया ही प्रचंड लांबलचक आणि गुंतागुंतीची आहे. न्याय मिळणे तर दूरच राहते. परंतु झालेला अन्याय समजावून सांगण्यासाठीच अनेकांची शक्ती, पैसा खर्च होत असतो. ही परिस्थिती बदलण्याचीदेखील आवश्यकता आहे.